(आनंद नारायण सावंत विरुध्द रघुनाथ महादेव मोरये वै.)

## नियमित दिवाणी मुकदमा क्र.६०/२०१७ नि. ८४ वरील आदेश

सदरचा अर्ज वादी यांनी निशाणी ८५ येथील फेरीस्तासोबत असलेली कागदपत्र अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावी याकरीता दाखल केलेला आहे.

०२. वादीचे कथन असे की, प्रस्तुत प्रकरणी वादी आपल्या तर्फे बरीच महत्वाची कागदपत्रे पुराव्यासाठी याकामी अभिलेखावर हजर करत आहे. सदरची कागदपत्रे याकामी अभिलेखावर दाखल करुन घेणे अत्यंत आवश्यक आहे तरी न्यायपुर्ततेसाठी सदरची कागदपत्रे दाखल करुन घ्यावी अशी विनंती वादीने केली आहे.

०३. प्रतिवादी क्र. १अ, १ब, १क, १ड, १इ, १फ, १ग, १फ, १य व १ह यांनी सदर अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. त्यांच्या कथनाप्रमाणे सदरील कागदपत्रे वादीच्या ताब्यात दावा दाखल करण्याच्या चार–पाच वर्षापुर्वीच ताब्यात आहेत व सदरचे कागदपत्रे विलंबाने का दाख्ल केले याचे समर्पक कारण अर्जात नमूद नाही. सबब, अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे. प्रतिवादी क्र. २ यांनी सदर अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. त्यांच्या कथनाप्रमाणे सीपीसी आदेश १३ नियम ३ अन्वये सदरहु कागदपत्रांची Relevancy सविस्तर अर्जात नमूद करुन न्यायालयाची परवानगी घेणे आवश्यक होते. अर्जात विलंबाचे कारण नमूद केलेले नाही. सबब, अर्ज फेटाळण्यास पात्र आहे असे कथन केले आहे.

०४. अर्ज व म्हणणे वाचून पाहीले, अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले, तसेच उभय पक्षकारांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीने सदर अर्जाच्या फेरीस्तासोबत दाखल केलेले कागदपत्र अनुक्रमांक १ ते २७ पैकी

काही कागदपत्र हे भारतीय पुरावा कायद्याचे कलम ७४ अन्वये सार्वजनिक दस्तऐवज आहेत असे दिसून येते. तसेच, सदरील कागदपत्रापैकी काही मुळ प्रती व काही सहीसुद नकला असल्याचे दिसून येते. वादीने प्रस्तुतचे कागदपत्र दाव्यातील वादमुद्दे निश्चीत झाल्यानंतर दिलेले आहेत. तरीही उभयपक्षकारा मधील असलेला वाद हा अंतिमरित्या न्यायनिर्णीत करण्याच्या दृष्टीने ते महत्वपुर्ण आहेत असे दिसून येते. प्रतिवादी यांना प्रस्तुत कागदपत्राच्या अनुषंगाने उलटतपासाची संधी असल्याने सदरचे दस्तऐवज हे दाव्याचे कामी अभिलेखावर सामिल करुन घेतल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणारे नाही. त्यामुळे सदर दस्तऐवज सामिल करुन घेणे उचित होईल. सदरचा दस्तऐवज हा भारतीय पुरावा कायद्यातील तरतुदीप्रमाणे शाबीत करण्याची जबाबदारी दाखल करणा–या पक्षकारावर असते. तसेच, भारतीय पुरावा कायद्यामध्ये दिलेल्या कलम ७७ प्रमाणे सार्वजनिक दस्तऐवजाच्या प्रमाणित प्रती अथवा सार्वजनिक दस्तऐवजाच्या भागातील मजकुराच्या शाबीतीसाठी त्या हजर करता येतील असे नमूद केले आहे. तसेच भारतीय पुरावा कायद्यात दस्तऐवज संबंधीची दिलेली गृहितके सदरचे कागदपत्रातील मजकूर शाबीत झाला किंवा कसे हे अंतिम युक्तीवादाचे वेळी विचारात घेता येईल. त्यामुळे सदर दस्ताऐवजास अभिलेखावर दाखल करुन घेण्याची परवानगी देणे मला उचित वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. नि. ८४ कडील अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

२. नि.८५ च्या फेरीस्तासोबतचे सर्व कागपत्र अभिलेखावर हजर करुन घेण्यात येत आहेत.

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2024.07.10 18:06:35 +0530

दिनांक– १०/०७/२०२४ (प.रा.ढोरे )

ठिकाण– कुडाळ. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कुडाळ.